नि. फौ. ख. क्र.५०/२०१८ निशाणी ३४

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – शाम मुरलीधर धर्माधिकारी

वय – ५८ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहा. पोलीस उप निरीक्षक

पत्ता – रा. गिता नगर, अकोला
ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०१८ या कालावधीमध्ये हे.कॉ. म्हणून कार्यरत होतो. दि.०६.०४.२०१७ या दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ या कालावधीमध्ये स्टेशन डायरी ड्युटी कर्तव्यावर असताना संध्या. ७.३० वा. सुमारास फिर्यादी हिम्मत काशिराम वानखडे हे फिर्याद देण्याकरीता आले व त्याने माहिती दिली की, त्याच्या मालकीची बैल जोडी ही रात्री २ वा. सुमारास अज्ञात इसमाने गायगाव येथून त्याच्या ताब्यातून चोरी केल्याचे सांगितले. त्यानुसार मी अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल केला व फिर्यादीची फिर्यादी जबाब नोंद केला. आता मला नि.क्र.२० व २१ वरील फिर्याद व छापील फिर्याद दाखविण्यात आली, ती मी नोंद करुन घेतलेली आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही असून तो मजकूर फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे नोंद करुन घेतला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास वरीष्ठांच्या आदेशाने बिट जमादार यांच्याकडे सोपविण्यात आला.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. फिरोजखान यांचे मार्फत उलटतपासः**

२. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे मी त्याचा फिर्यादी जबाब नोंद केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरचा खोटा गुन्हा नोंद केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद नोंद करण्यापुर्वी मी कोणत्याही गोष्टीची शहानिशा केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २३.०९.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.09.23 16:15:21 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २३/०९/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २३/०९/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २३/०९/२०२५ |